सत्यमेव जयते


# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.

९३, मल्हार पेठ, सातारा.

दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५

ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in


जा.क्र/जिवानिशा/वाहतुक अधिसुचना/१०५/२०२६ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - २५/०३/२०२६

## अधिसुचना

दहिवडी पोलीस ठाणे हद्दीत मौजे शिखर शिंगणापुर येथे सालाबाद प्रमाणे श्री. शंभु महादेव देवाची यात्रा दि. २३/०३/२०२६ ते ०२/०४/२०२६ रोजी अखेर संपन्न होणार असुन सदर यात्रेतील मानाच्या कावडीचा मुख्य दिवस दि. ३०/०३/२०२६ रोजीचा असुन सदर दिवशी शिखर शिंगणापुर ते फलटण जाणारे रोडवरुन कावडी तसेच पायी वारी करणारे भाविक येणार असलेन सदर रोडवरील वाहतुकीवर परीणाम होण्याची शक्यता असलेने सदर दिवशी वाहतुक सुरळीत राहणेकामी तसेच भाविकांची/नागरीकांची व वाहन चालकांची गैरसोय होवु नये याकरीता सदर मार्गावरील वाहतुकीचे नियोजन करणे आवश्यक आहे. त्या करीता पर्यायी मार्गाची उपलब्धता असलेने सदर मार्गावरील वाहतुक वळविणे आवश्यक आहे. त्याबाबतची अधिसुचना प्रसिद्ध करणेत येत आहे.

मी तुषार दोशी भापोसे, पोलीस अधीक्षक सातारा, मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये शिखर शिंगणापुर ते फलटण जाणारे रोड वरील वाहतूक मार्गात बदल करुन वाहतुक व्यवस्था सुरळीत राहणेकरीता दि.३०/०३/२०२६ रोजी सकाळी ०६.०० ते २३.०० वा पर्यत खालील अधिसुचना पारित करीत आहे.

### वाहतुक मार्गातील बदलाबाबत

### वाहतुक मार्गातील बदल खालीलप्रमाणे करण्यात आला आहे.

१. शिखर शिंगणापुर वरुन फलटण बाजुकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक ही शिखर शिंगणापुर - दहिवडी - मोगराळे घाटातुन फलटण अशी जाईल किंवा शिखर शिंगणापुर - नातेपुते - बरड वरुन फलटण अशी जाईल.

२. शिखर शिंगणापुर - कोथळे - कर्णवाडी - आंदरुड - फलटण या मार्गावरील वाहतुक एकेरी करण्यात आलेली आहे.

तरी वरील वाहतूक ज्या ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. त्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतुक मार्गात केलेल्या बदलांबाबत सर्व नागरीकांनी/भाविकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवून पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसुचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दिनांक २५/०३/२०२६ रोजी जारी करण्यात आली आहे.

SUPDT. OF POLICE SATARA

(तुषार दोशी) भापोसे
पोलीस अधीक्षक सातारा

Scanned with CamScanner

ठिकाण - सातारा
दिनांक - २५/०३/२०२६
प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे
२/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.

२) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.

३) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता,लोकमत, तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार, पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी

४) पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, सांगली, पुणे ग्रामीण
२/- सदर आदेशाची प्रसिध्दी आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक वृत्तपत्रामध्ये करणेस विनंती.

५) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.

६) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

<u>प्रत माहीतीसाठी सादर</u>

८) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.

९) मा.जिल्हाधिकारी सातारा.

१०) पोलीस अधीक्षक,महामार्ग परिक्षेत्र पुणे.

Scanned with CamScanner